ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७९४ /२०२६ दि. ०९/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत **दिनांक १४/०९/२०२६ ते दिनांक २५/०९/२०२६** रोजी पावेतो गणेशोत्सव सणानिमित्ताने गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी)** गणपती विसर्जन करण्याकरीता मोठया संख्येने भाविक निघत असतात. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद – १) साकेत, विटावा तसेच कळवा नाकाकडुन क्रिकनाका मार्गे सिडको कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **क्रिकनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने क्रिक नाका येथून कोर्टनाका मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जांभळीनाका बाजारपेठ स्टेशन रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) जी.पी.ओ. कोर्टनाका येथून ठाणे रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, कोर्टनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, कोर्टनाका येथून डावीकडे वळण घेवुन जांभळीनाका मार्गे मुख्य बाजारपेठ स्टेशनरोड मार्गे ए वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) चरई व सिव्हील हॉस्पीटल कडून टेंभीनाका मार्गे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **म.न.पा. शाळा येथे उजवीकडे टॉवरनाक्याकडे जाणारा मार्ग** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने कोर्टनाका सर्कल येथून उजवीकडे वळण घेवुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, कोर्टनाका येथे डावीकडे वळून जांभळीनाका मार्गे बाजारपेठ स्टेशनरोड मार्गे ए वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ४) ठाणे स्टेशन कडून टॉवरनाका/टेंभीनाकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस, मोठी वाहने, रिक्षा, चारचाकी लहान वाहने यांना **मुस चौक** व **टॉवरनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – ठाणे रेल्वे स्टेशन कडून सॅटिस ब्रिजवरून येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस.टी./टी.एम.टी. बसेस बी कॅबिन सॅटिस ब्रिजवरून गोखले रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील. तसेच रिक्षा, चारचाकी लहान वाहने सॅटीस ब्रिजखालून स्टेशन रोड, मुस चौक येथून सरळ टॉवरनाका मार्गे टेंभीनाका येथुन डावे वळण घेवुन इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक १५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दिनांक १८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दिनांक १९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दिनांक २०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दिनांक २५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी) या** कालावधीत **दुपारी १४.०० वा. पासुन ते गणेश मूर्ती विसर्जन संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.